स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



## Office of the Controller of Examinations

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र.पनिका/मुल्यांकन कार्य/२०१५-१६/3174 दिनांक : २६/११/२०१५.

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **हिवाळी २०१५ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या मुल्यांकनाकरीता प्राध्यापकांना कार्यमुक्त करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त परिपत्रक ान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी २०१५ परीक्षेच्या उत्तरपुस्तीक ांचे जिल्हानिहाय मुल्यांकन केंद्राचे क ाम खालील महाविद्यालयातआयोजित केलेले आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | मुल्यांकन केंद्र | विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | केंद्रीय मुल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ. | सर्व विद्याशाखा |
| २ | परभणी | ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी | संगणक, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा |
| | | शिवाजी महाविद्यालय परभणी | कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा |
| ३ | हिंगोली | आदर्श महाविद्यालय | सर्व विद्याशाखा |
| ४ | लातूर | दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूर | औषधनिर्माणशास्त्र व विज्ञान विद्याशाखा |
| | | महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर | कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा |
| | | दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर | सर्व विद्याशाखा |
| | | आर.ई.एस. संस्थेचे संगणक व मा.शा.महाविद्यालय लातूर | वाणिज्य विद्याशाखा |
| | | शिवाजी महाविद्यालय उदगीर | संगणकशास्त्र विद्याशाखा |

सर्व संबंधीत परीक्षक ांना जाण्या-येण्याच्या सोयीनुसार नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक/अधिव्याख्यातांना त्वरीत उत्तरपुस्तीकेच्या मुल्यांकन कार्यासाठी कार्यमुक्त करावे व त्या आदेशाची एक प्रत परीक्षा विभागास पाठवावी.

आपणास विदीतच् आहे की, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७२ नुसार परीक्षा संपल्यापासुन ३० दिवसात निकाल जाहीर करणे आवश्यक आहे. याबाबत मा. कुलपती महोदय, उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा पुणे यांचेकडुन निकाल वेळेत जाहीर करण्याबाबतचे वेळोवेळी आदेश /पाठपुरावा होत आहे. निकाल उशिरा लागल्याची कारणमिमांसा कळवावी लागते. निकाल उशिरा जाहीर झाल्याबददूल तारांकीत प्रश्नही उपस्थित झालेले आहेत. तसेच दि. २३/३/२०१५ रोजी संपन्न झालेल्या मा. अधिसभेच्या बैठकीतील विषय क्र. १७ नुसार **जे महाविद्यालय पेपर तपासणीसाठी शिक्षक पाठवित नसतील अशा महाविद्यालयाविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात यावी, असा** ठराव संमत झालेला आहे. सदरच्या ठरावानुसार परिपत्रकही निर्गमीत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३२ (६) (ग) नुसार परीक्षेचे काम करणे बंधनकारक आहे.

सबब, उपरोक्त परिस्थीती विचारात घेता जे प्राध्यापक/अधिव्याख्याता मुल्यांकनाच्या कामात कसुर करतील किंवा जे प्राचार्य संबंधीतांना कार्यमुक्त करणार नाहीत त्यांच्याविरुध्द नाईलाजाने कारवाई करावी लागेल याची नोंद घेवुन हि बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणुन दयावी व हिवाळी २०१५ चे उत्तरपुस्तीका मुल्यांकन कार्यास सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

**प्र-परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव :**
मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ